| | |
|---|---|
| **MHYA050010552025** | **–: निकालपत्र :–**<br>**(घोषीत तारीख २४/०४/२०२६)**<br>**सरकार विरुद्ध बेबीबाई केशव जाधव** |

१. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतो, त्यास खालील कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे शाबीत केले काय की, दिनांक ३१/१०/२०२४ रोजी दुपारी १.१५ वाजण्याच्या सुमारास जांबबाजार, ता. पुसद जि. यवतमाळ येथे एका प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये १० लिटर गावठी हातभट्टीची दारु प्रति लिटर १०० रुपये किंमत अंदाजे १०००/– रुपयाची दारु विक्री करण्याच्या उद्देशाने व स्वतःचे आर्थिक फायद्याच्या उद्देशाने बाळगून होता आणि त्याअंतर्गत आरोपीने मुंबई दारुबंदी अधिनियम ६५(ई) नुसार अपराध केला? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश? | **आरोपीस निर्दोषमुक्त करण्यात येते.** |

## –: कारणमिमांसा :–

**प्रश्न क्रमांक १ साठी**–

२. आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ 'एक' साक्षीदारांची साक्ष नोंदविली. साक्षीदार क्रमांक–**१ संतोष भिका राठोड** यांची साक्ष ***निशाणी क्रमांक–१२*** वर नोंदविण्यात आली. अभियोगपक्षास वारंवार संधी देऊनही त्यांनी फिर्यादी, इतर स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी व पंच साक्षीदारांची व तपासी अधिकारी यांची साक्ष घेतली नाही. अभियोगपक्षाने त्यांचा पुरावा निशाणी–१ प्रमाणे बंद केला. आरोपीतर्फे कोणीही साक्षीदार तपासले नाही.

३. आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरिता अभियोगपक्षने शाबीत करणे गरजेचे आहे की, दिनांक ३१/१०/२०२४ रोजी दुपारी १.१५ वाजण्याच्या सुमारास जांबबाजार, पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ येथे आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशिररीत्या एका प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये १० लिटर गावठी हातभट्टीची दारु प्रति लिटर १०० रुपये किंमत अंदाजे १०००/– रुपयाची दारु विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला. सदर अपराध सिद्ध

करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक–**१ संतोष भिका राठोड** यांची साक्ष ***निशाणी क्रमांक–१२*** वर नोंदविण्यात आली. उपरोक्त साक्षीदार हे घटना स्थळ व जप्ती पंचनाम्यावरील 'पंच साक्षीदार' असून त्यांनी साक्षीदरम्यान कथन केले की, त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी पोलीसांनी बोलावले नव्हते. तसेच, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. तसेच, पंचनाम्यातील मजकूर खरा नसल्याचे कथन केले. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य केली. पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत केली नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये साक्षीदार यांना उलटतपासात विचारता येतील असे 'सूचक प्रश्न' विचारण्यास परवानगी देण्यात आली. परंतु, उलटतपासातही उपरोक्त साक्षीदार यांच्या साक्षीतून घटनेच्यादिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हा दोषारोपात नमूद केल्याप्रमाणे एका प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये १० लिटर गावठी हातभट्टीची दारु प्रति लिटर १०० रुपये किंमत अंदाजे १०००/– रुपयाची दारु विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून होता असे काहीही अभियोगपक्षास निष्पन्न करता आले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष घटनास्थळ/जप्ती पंचनामा सिद्ध करु शकला नाही.

४. अभियोगपक्षास वारंवार संधी देवूनही अभियोगपक्ष फिर्यादी, इतर स्वतंत्र साक्षीदार किंवा तपासी अंमलदार यांना तपासु शकले नाही. प्रस्तुत प्रकरणात रासायनिक विश्लेषणासाठी नमुना पाठविण्याबाबत केवळ प्रोफॉर्म दाखल केलेला आहे. परंतु, सदर नमुना

वैज्ञानिक प्रयोगशाळेत जमा केल्याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तसेच, केमिकल अॅनालायझरचा रिपोर्ट या खटल्यात तपासअधिकारी यांनी दाखल केला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात मिळून आलेले द्रव्य हे गावठी हातभट्टीची दारुच होती ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली नाही. या व्यतिरीक्त जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला असे दाखवणारा कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे जप्त केलेले द्रव्य ही गावठी हातभट्टीची दारुच होती व आरोपीच ती जप्त दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून होता किंवा कसे ही बाब सिद्ध होण्याइतपत सबळ पुरावा अभियोगपक्षाने न्यायालयासमोर आणला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने प्रस्तुतची केस सामान्य बुद्धीच्या संशयापलीकडे सिद्ध केली नाही. सबब, आरोपीविरुद्ध मुंबई दारुबंदी अधिनियम ६५(ई) अन्वये गुन्हा केला हे सिद्ध करणारा सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. परिणामतः आरोपीस निर्दोषमुक्त करण्यात येते. वरील कारणास्तव मी प्रश्न क्र.१ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**प्रश्न क्रमांक २ साठी**–

५. वरील सर्व साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता व प्रश्नांचे निष्कर्ष विचारात घेतले असता, अभियोगपक्ष आरोपीविरुद्धचे दोषारोप सबळ पुराव्याद्वारे सिद्ध करु शकला नाही. परिणामतः आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब, मी प्रश्न क्र. २ चे निष्कर्षाकरीता खालील आदेश पारित करीत आहे.

| -: **आदेश** :- | |
|---|---|
| १. | भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) अन्वये आरोपी **बेबीबाई केशव जाधव** यांची मुंबई दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये ठेवलेल्या अपरांधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपिल अथवा इतर अर्ज दाखल झाल्यास हजर राहण्यासाठी म्हणून दाखल केलेली रक्कम रुपये १५,०००/–(पंधरा हजार रुपये मात्र) चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपात्राची मुदत ६ महिने राहिल. |
| ४. | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).** |

**स्वा/–**

दिनांक २४/०४/२०२६

**(श्रीमती व्ही. डी. बिरहारी)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पुसद (न्यायालय क्र.२)

ता. पुसद, जि. यवतमाळ.